Charter Date.29/08/2018

Club No.89561

TEAM PINNACLE
R.I.Dist-3060

Rotary
Club Of Nandanagari
2020-21

Rotary Opens Opportunities

**Nagsen Pendharkar**
President
Mo.No.-9923129782

**Manoj Gaikwad**
Secretary
Mo.No.-7507217789

(संपादक, जितेंद्र सोनार, मो.नं.९४२०२५६८२०)

# ‘उडान’

## रोटरी बुलेटीन (सप्टेंबर-ऑक्टोबर २०२०)

## आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

कोरोनाची पार्श्वभूमी लक्षात घेता शहादा तालुक्यातील मोदीलाल पाडा या गावात रोटरी क्लब नंदनगरी व फ्रेंडस फौंडेशन, कडवान, ता. नवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जवळपास ९५ ग्रामस्थांची तपासणी करण्यात आली. या वेळी रोटरी क्लब नंदनगरी चे अध्यक्ष नागसेन पेंढारकर, सचिव मनोज गायकवाड, फ्रेंडस फौंडेशन चे कार्यकारी संचालक शामुवेल गावीत, रोटरी नंदनगरी चे इसरार सैयद, एन.टी.पाटील, रणजित राजपूत, डॉ.शशिकांत भारती आदी. उपस्थित होते. या वेळी गरोदर मातांना मल्टी व्हिटॅमिन गोळ्या व टॉनिक देण्यात आले. ग्रामस्थांची सर्वसाधारण तपासणी करून ताप, खोकला, पोटदुखी आदी.आजारांवरची औषध देण्यात आली. तसेच गरजूंना फॉलिक ऍसिड च्या गोळ्यांचे देखील वाटप करण्यात आले. या सर्व ग्रामस्थांची तपासणी डॉ.शशिकांत भारती यांनी केली. या दरम्यान फ्रेंड्स फाउंडेशनचे असिस्टंट टिचर याकोब गावीत, रोटरी नंदनगरी चे अध्यक्ष नागसेन पेंढारकर व सचिव मनोज गायकवाड यांनी गावातील लहान मुलांना मनोरंजनात्मक विविध खेळ खेळविले व शिकविले. विजेत्या लहान मुलांना विविध खेळणी तसेच चॉकोलेट, बिस्कीट व केक देऊन प्रोत्साहित केले.




शिक्षक दिनानिमित्त रोटरी उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रदान



रोटरी क्लब ऑफ नंदनगरीतर्फे जिल्हा रुग्णालयासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# थोडक्यात,

**4 way Test**

चतुरंग जीवनदृष्टी

आपण रोटरीचा कुठलाही कार्यक्रम सुरू करतांना 4 way Test चे वाचन करतो त्याचा नेमका अर्थ प्रत्येक रोटरी सभासदाला माहीत हवा. आज मी याची निर्मिती कशी झाली ते सांगणार आहे. रोटरीची 4 Way Test ही जागतिक पातळीवर व्यावसायिक नितीमुल्य संबंधित सर्वाधिक प्रसारित होणारी, उद्धृत केली जाणारी व मुद्रित केली जाणारी संहिता आहे आणि रोटरी साठी ती अभिमानाची गोष्ट आहे. हर्बर्ट टेलर या रोटरीअन्स ची शिकागो शहरात क्लब अल्युमिनियम नावाची कंपनी होती ती काही कारणाने दिवळखोरीच्या मार्गावर होती. आर्थिक परिस्थिती वर मात करण्यासाठी त्यांनी खूप विचार करून आपल्या कार्यालयातील कर्मचारी, कामगार वर्ग व स्व:ताहाच्या खाजगी जीवनात वापरण्या साठी एक आचारसंहिता तयार केली तीच फोर वे टेस्ट्ही आचारसंहिता त्यांनी उत्पादन, विक्री, जाहिरात, ग्राहक व विक्रेते संबंध यात वापरली व त्यांच्या कंपनीचा पुन्हा उदय झाला. त्यांनी पुढे रोटरी समोर याची माहिती दिली व १९४३ साली रोटरी इंटरनॅशनल ने ती अधिकृतपणे स्वीकारली।आज ही फोर वे टेस्ट जगातील १०० हुन अधिक भाषेत प्रकाशित केली गेली आहे.

(IS IT TRUTH)
हे सत्य आहे काय?

(IS IT FAIR TO ALL CONCERNED)
हे सर्वांना न्याय देणार आहे काय?

(WILL IT BUILD GOODWILL AND BETTER FRIENDSHIP)
यामुळे सदभाव व अधिक चांगला स्नेहभाव निर्माण होईल काय?

(WILL IT BENEFICIAL TO ALL CONCERNED)
हे सर्वांना लाभदायक होईल काय?